# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
## जनसंपर्क विभाग

कक्ष क्रमांक १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई ४०० ०५१.
दूरध्वनी क्रमांक : ०२२ ६६४०५०६६ संकेतस्थळ : https://mhada.gov.in


जा.क्र.जसंवि/प्रसिद्धी पत्रक/ १७२८ दि. २६/११/२०२०

<u>प्रसिद्धी पत्रक</u>

# 'म्हाडा'मध्ये संविधान दिनानिमित्त संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन

मुंबई, दि. २६ नोव्हेंबर, २०२० : भारताच्या घटना परिषदेने देशाची राज्यघटना दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी देशाला अर्पण केली, या घटनेला ७१ वर्षे होत असल्याचे औचित्य साधत महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) वांद्रे पूर्व येथील मुख्यालयात आज संविधान दिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल डिग्गीकर यांनी अधिकारी-कर्मचारी यांच्यासह छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिल्पाला पुष्पांजली अर्पण करून संविधानाच्या उद्देशिकेच्या (Preamble) सामुहिक वाचनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

भारतीय संविधान निर्मितीमधील संस्थापकांच्या योगदानाचा उचित सन्मान व्हावा म्हणून दिनांक २६ नोव्हेंबर हा दिवस 'संविधान दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. जगातील सर्वोच्च ठरलेल्या भारताच्या संविधानाने देशातील प्रत्येक व्यक्तीला मान, सन्मान आणि समानतेचा हक्क दिला स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्वांवर आधारित भारताच्या संविधानाने देशाला एकजूट ठेवले असून सर्वधर्म समभावाची जोपासना केली आहे. म्हणूनच भारतीय संविधानाबाबत जनजागृती आणि सर्व नागरिकांना संविधानाची ओळख व्हावी, याकरिता राज्यात दरवर्षी संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन केले जाते. याच पार्श्वभूमीवर आज हा कार्यक्रम घेण्यात आला.

श्री. अनिल डिग्गीकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमाला म्हाडाचे मुख्य अभियंता-१ श्री. धीरजकुमार पंदिरकर, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. अरुण डोंगरे, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे मुख्य अधिकारी डॉ. योगेश म्हसे, वित्त नियंत्रक श्री. विकास देसाई, मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार श्री. प्रवीण साळुंखे, 'म्हाडा'चे सचिव श्री. राजकुमार सागर, मुख्य जनसंपर्क अधिकारी श्रीमती वैशाली गडपाले आदींसह म्हाडातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक म्हाडा मागासवर्गीय कर्मचारी संघटनेचे प्रधान कार्यवाह श्री. एस. के. भंडारे यांनी केले.

या कार्यक्रमावेळी कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर शासनाने आखून दिलेल्या नियमावलीचे पालन करण्यात आले, तसेच या कार्यक्रमात सुरक्षित अंतराचे पालन व्हावे, म्हणून 'म्हाडा'तील विविध विभागांमध्ये अधिकारी-कर्मचारी यांनी मुख्य कार्यक्रम स्थळी न येता त्यांच्या कार्यालयातच संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले.

या प्रसंगी २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील शहीद पोलीस अधिकारी-कर्मचारी, सैन्य दलातील वीर जवान यांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून म्हाडातील अधिकारी-कर्मचारी यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

**(वैशाली गडपाले)**
**मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा**



महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) वांद्रे पूर्व येथील मुख्यालयात संविधान दिनानिमित्त संविधानाच्या उद्देशिकेचे (Preamble) सामुहिक वाचन करताना 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल डिग्गीकर. समवेत मुख्य अभियंता-१ श्री. धीरजकुमार पंदिरकर, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी श्री.अरुण डोंगरे, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे मुख्य अधिकारी डॉ. योगेश म्हसे, वित्त नियंत्रक श्री. विकास देसाई, मुख्य वास्तुशास्त्रज्ञ श्री. प्रवीण साळुंखे, म्हाडाचे सचिव श्री. राजकुमार सागर, मुख्य जनसंपर्क अधिकारी श्रीमती वैशाली गडपाले, म्हाडा मागासवर्गीय कर्मचारी संघटनेचे प्रधान कार्यवाह श्री. एस. के. भंडारे आदी.

====